# मुख्य न्यायदंडाधिकारी, एस्प्लनेड न्यायालय, मुंबई.

दिनांक ०७.०१.२०२६.

## निविदा सूचना

मुख्य न्यायदंडाधिकारी, मुंबई यांच्या अधिपत्याखाली असलेल्या (एस्प्लनेड, मुंबई सी.एस.टी., गिरगांव, बेलार्ड पिअर, माझगांव, दादर (शिवडी), शिंदेवाडी, बालन्यायालय डोंगरी, कुर्ला, विक्रोळी, मुलुंड, मुंबई सेंट्रल, बांद्रा, अंधेरी, विलेपार्ले व बोरीवली) १६ न्यायालयीन संकुलातील न्यायालयाच्या कार्यालयातील जुनी व नष्ट करण्याजोगी रद्दी विकणेसाठी, संबंधित ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. संबंधित ठेकेदारांनी आपल्या निविदा सादर करतांना निविदेमध्ये रद्दीचा प्रति किलो दर देण्यात यावा. त्याचप्रमाणे, संबंधितांनी नोंद घ्यावी की, या कार्यालयाची जुनी व नष्ट करण्याजोगी रद्दी ही वरील नमुद १६ न्यायालयीन केंद्रात प्रत्यक्ष जाऊन घ्यावी लागेल आणि सदर रद्दी मोजण्यासाठी इलेक्ट्रॉनीक साधनांचाच वापर करावा लागेल. संबंधित ठेकेदारांनी आपल्या निविदा बंद लिफाफॅमध्ये घालून त्यावर **"रद्दी निविदा"** असे स्पष्ट लिहावे.

तरी सदरची रद्दी विकत घेऊ इच्छिणाऱ्या ठेकेदारांना याद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी आपल्या मोहरबंद निविदा मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे कार्यालयात ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून दिनांक १६.०१.२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत सादर कराव्यात.

विहित मुदतीत प्राप्त न झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही, याची संबंधित ठेकेदारांनी नोंद घ्यावी.

सही/-
(श्रीमती. अ. कृ. मांडवगडे)
मुख्य न्यायदंडाधिकारी,
एस्प्लनेड, मुंबई.